महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक एमआयएस-०१२०/सी.आर.०१/२०२०/तेवीस दिनांक ७ ऑक्टोबर, २०२०

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय:-वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षांकरीता उत्तरपत्रिकांच्या स्कॅन इमेजेस उमेदवाराच्या प्रोफ़ाईलमध्ये उपलब्ध करुन देण्याबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून आयोजित केल्या जाणा-या वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या सर्व परीक्षांकरीता उमेदवारांना दोन भागांची उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देण्यात येते. त्यापैकी भाग-१ (मूळ प्रत) हा परीक्षेनंतर आयोगाच्या कार्यालयाकडे जमा करण्यात येतो. तर भाग-२ (कार्बन प्रत) परीक्षेनंतर सोबत घेऊन जाण्याची मुभा उमेदवारास देण्यात आली आहे.

**२.** उमेदवाराने परीक्षेच्या वेळी त्यांची उत्तरे उत्तरपत्रिकेवर आयोगाच्या सूचनांनुसार व उत्तरपत्रिकेच्या मलपृष्ठावर सविस्तरपणे उद्‌घृत केलेल्या सूचनांनुसार नोंदविणे (वर्तुळ छायांकित करणे) गरजेचे आहे. उत्तरपत्रिकेच्या भाग-२ (कार्बन प्रत) वरुन उमेदवारास त्याने संबंधित परीक्षेमध्ये छायांकित केलेली उत्तरे आयोगाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या उत्तरतालिकेवरुन पडताळून पाहता येतात. त्यामुळे उमेदवारास प्राप्त होऊ शकणा-या गुणांचा अंदाज बांधता येतो. उमेदवारांना त्यांनी संबंधित परीक्षेमध्ये प्रत्यक्ष प्राप्त केलेले अचूक गुण ज्ञात व्हावेत व उमेदवारास परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या संदर्भात कोणतीही शंका राहू नये, याकरीता खालील तपशील संबंधित परीक्षेच्या निकालानंतर त्यांच्या वैयक्तिक प्रोफाईद्वारे उपलब्ध करुन देण्याचा आयोगाकडून निर्णय घेण्यात आला आहे:-

(१) मूळ उत्तरपत्रिकेची स्कॅन इमेज

(२) निकालाकरीता गृहित धरलेले एकूण गुण

(३) उमेदवार पात्र असलेल्या प्रवर्गाकरीताच्या गुणांची किमान सीमांकन रेषा

**३.** आयोगाचा उपरोक्त निर्णय दिनांक १ ऑक्टोबर, २०२० नंतर आयोजित होणा-या सर्व स्पर्धा परीक्षा, मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा तसेच चाळणी परीक्षांकरीता लागू राहील.

सह सचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

mpscmaterial.com

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial